# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २६२**

**''तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना भेदभाव न करता महाविद्यालय/परिसंस्था मध्ये प्रवेश देणेबाबत''**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व कल्याण अधिनियम, २०१९ व तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व कल्याण नियम, २०२० लागू करण्यात आलेला आहे. तृतीयपंथ घटकातील विद्यार्थ्यांना सापत्न वागणूक व भेदभाव न करता महाविद्यालय/परिसंस्था मध्ये प्रवेश देण्यात यावा व प्रवेश देण्यास कोणत्याही प्रकारची टाळाटाळ करण्यात येवू नये, असे शासनाने स्पष्ट आदेश दिलेले आहेत. ( सोबत पत्राची प्रत जोडली आहे ) तसेच तृतीयपंथी या दुर्लक्षित समाज घटकांच्या प्रश्नांवर कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्थाकडून प्रवेशातील अडचणींबाबत संपर्क केल्यास त्यांना सहकार्य करावे अशी सूचना केलेली आहे.

सबब, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की आपल्या स्तरावर तृतीयपंथीय घटकातील पात्र विद्यार्थ्यांना कोणताही भेदभाव न करता प्रवेश देण्यात यावा. तसेच सदर पत्रातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४४१५ }
दिनांक : ३०/१०/२०२३ }

प्रत :

**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे–०७.**

महाराष्ट्र शासन
**समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे-४११००१**
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२६३०७ ई-मेल- sakalyanpunenahas@gmail.com

क्र.सकआ/मावक/तृतीयपंथी/भेदभाव/२०२३-२४/का-१२/१५१२ दिनांक १३ ऑक्टोबर,२०२३

प्रति,

कुलसचिव,
विद्यापीठे (सर्व)

**विषय : तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना भेदभाव न करता शाळा / महाविद्यालयांमध्ये प्रवेश देणेबाबत...**

**संदर्भ** : १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.२०१८/प्र.क.२६/सामासु, दिनांक १३.१२.२०१८
२) केंद्र शासनाचा तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व कल्याण अधिनियम, २०१९
३) केंद्र शासनाचे तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व कल्याण नियम, २०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, केंद्र शासनाने तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व कल्याण अधिनियम, २०१९ व तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व कल्याण नियम, २०२० लागू केले आहे. तृतीयपंथीय हा समाजातील एक दुर्लक्षित घटक असून, या घटकास समाजाकडून सापत्न व भेदभावाची वागणूक दिली जाते. नेहमीच भेदभाव, सापत्न वागणूकीमुळे समाजातील हा घटक विकास प्रक्रियेपासून दुर्लक्षित राहिलेला आहे. त्यामुळे या समाज घटकांचे शासनामार्फत मुलभूत अधिकारांचे संरक्षण करुन त्यांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

तृतीयपंथीय समाज घटकांची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणले जाणे आवश्यक आहे. तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना वेगळी वागणूक दिली जाते. त्यामुळे त्यांना शिक्षण घेताना अडचणी निर्माण होत आहेत. तसेच त्यांचेवर मानसिक परिणाम होत आहे, त्यामुळे भेदभाव न करता शाळा / महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्यात यावा. तसेच शाळा / महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्यास टाळाटाळ करत असलेल्या संबंधित शैक्षणिक संस्थांना याबाबत सूचना देण्यात याव्यात. तृतीयपंथी या दुर्लक्षित समाज घटकांच्या प्रश्नांवर कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडून शाळा प्रवेशातील अडचणींबाबत संपर्क झाल्यास त्यांना सहकार्य करावे, अशा सूचना आपले अधीनस्त सर्व शैक्षणिक संस्थांना निर्गमित होणेस विनंती आहे.

13-10-23

**(ओम प्रकाश बकोरिया)**
**आयुक्त, समाजकल्याण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत : माहितीस्तव सादर :-
मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२